# महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,
## मुंबई विभागीय मंडळ, वाशी, नवी मुंबई–४०० ७०३.

**परिपत्रक क्र.मुंविमं/के.नि./मार्च–एप्रिल २०२२ परीक्षा/सूचना/३३२४ दिनांक १६/०३/२०२२**

**विषय** : मार्च–एप्रिल २०२२ उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.१२वी) व माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ.१०वी) परीक्षेसाठी परीक्षा दालनात विलंबाने येणाऱ्या परीक्षार्थ्यांना प्रवेश नाकारणेबाबत...

मुंबई विभागीय मंडळाचे कार्यक्षेत्रातील मार्च–एप्रिल २०२२ च्या इ.१२वी व इ.१०वी परीक्षांसाठी नियुक्त केलेल्या परिरक्षक, केंद्रसंचालक व उपकेंद्रसंचालक यांना या परिपत्रकाद्वारे कळविण्यात येते की, महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळातर्फे घेण्यात येणारी उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.१२वी) ची लेखी परीक्षा दि.०४/०३/२०२२ ते दि.०७/०४/२०२२ व माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ.१०वी) ची लेखी परीक्षा दि.१५/०३/२०२२ ते दि.०४/०४/२०२२ या कालावधीत आयोजित करण्यात आली आहे.

लेखी परीक्षेसाठी विहीत वेळेपेक्षा (सकाळ सत्रात १०.३० वा व दुपार सत्रात ३.०० वा) उशिराने येणाऱ्या विद्यार्थ्यांबाबत पुढीलप्रमाणे कार्यपध्दती होती. उत्तरपत्रिका लेखन प्रत्यक्ष सुरू झाल्यानंतर विद्यार्थ्यांना परीक्षागृहात प्रवेश देण्याची सुविधा उपलब्ध नाही. मात्र अपवादात्मक परिस्थितीत सदर वेळेनंतर १० मिनिटे उशिरा येणाऱ्या परीक्षार्थ्यांना विलंबाच्या कारणाची खातरजमा करून केंद्रसंचालक स्तरावर परवानगी देण्यात येत होती. उपरोक्त १० मिनिटांनंतर अतिशय अपवादात्मक परिस्थितीत विद्यार्थी परीक्षेस प्रविष्ठ होण्यास केंद्रावर आल्यास व त्यामागचे कारण केंद्रसंचालकांना रास्त वाटल्यास त्यांनी विभागीय अध्यक्ष/विभागीय सचिव यांची दूरध्वनीवरून पूर्वमान्यता घेवून आणखी १० मिनिटे (एकूण २० मिनिटांचा) विलंब क्षमापित करून परीक्षार्थ्याला परीक्षेस प्रविष्ठ करून घेता येईल अशा सूचना राज्य मंडळाकडून देण्यात आलेल्या आहेत.

**तथापि, या सवलतीचा लाभ घेवून लेखी परीक्षेस उशिरा प्रविष्ठ होणाऱ्या विद्यार्थ्यांच्या मोबाईलमध्ये गैरमार्गाने प्रसारीत झालेला प्रश्नपत्रिकेतील आशय असल्याचे निदर्शनास आले आहे. सदर बाब अतिशय गंभीर असल्याने अशा प्रकरणांमध्ये संबंधीतांविरूध्द गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. तथापि, या गैरप्रकारांना प्रतिबंध करण्यासाठी लेखी परीक्षेस उशिराने प्रविष्ठ होवू देण्याची सवलत दि.१६/०३/२०२२ पासून बंद करण्यात येत आहे. याबाबत पुढीप्रमाणे कार्यवाही करण्यात यावी.**

१. सर्व संबंधीत विद्यार्थ्यांनी परीक्षा सुरू होण्यापूर्वी किमान एक तास अगोदर परीक्षा केंद्रावर हजर राहणे आवश्यक आहे.
२. विद्यार्थ्यांना परीक्षा सुरू होण्यापूर्वी १० मिनिटे अगोदर (प्रश्नपत्रिका वाटप करण्याच्या वेळेपर्यंत) म्हणजेच सकाळच्या सत्रामध्ये स.१०.२० पर्यंत आणि दुपारच्या सत्रामध्ये दु.२.५० पर्यंत परीक्षा कक्षामध्ये हजर राहणे बंधनकारक राहील.
३. विद्यार्थी अपरिहार्य कारणामुळे परीक्षा केंद्रावर परीक्षा सुरू होतेवेळी म्हणजेच सकाळच्या सत्रामध्ये स.१०.३० वा. व दुपारच्या सत्रामध्ये दु.३.०० वा. पर्यंत आल्यास त्याचे शैक्षणिक नुकसान होवू नये यासाठी त्यांची तपासणी करून विद्यार्थ्यास विभागीय मंडळाच्या मान्यतेने परीक्षेस बसण्यास परवानगी देण्यात यावी.
४. परीक्षा सुरू झाल्यानंतर म्हणजेच सकाळच्या सत्रामध्ये स.१०.३० नंतर व दुपार सत्रामध्ये दु.३.०० नंतर कोणत्याही परिस्थितीत विद्यार्थ्यांना परीक्षा कक्षामध्ये प्रवेश देण्यात येवू नये.

**परीक्षा केंद्रात मोबाईल व अन्य तत्सम साधने बाळगण्यास व वापरण्यास प्रतिबंध करण्यात आलेला आहे, ही बाब सर्व परीक्षार्थी, केंद्रावरील सर्व कर्मचारी यांचे निदर्शनास आणून देण्यात यावी, तसेच वरील सूचना विद्यार्थी, मुख्याध्यापक, प्राचार्य, केंद्रसंचालक, उपकेंद्रसंचालक, परिरक्षक व अन्य संबंधीत घटकांना तातडीने अवगत करण्यात याव्यात.**

(डॉ.सुभाष बोरसे)
विभागीय सचिव,
महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक
शिक्षण मंडळ, मुंबई विभागीय मंडळ,
वाशी, नवीमुंबई–४०० ७०३.

**प्रत माहितीस्तव व कार्यवाहीसाठी –**

१. प्राचार्य, मुख्याध्यापक, सर्व मान्यताप्राप्त क.महाविद्यालयाचे प्राचार्य वा माध्य.शाळांचे मुख्याध्यापक
२. शिक्षणाधिकारी (माध्य.), जिल्हा ठाणे/रायगड/पालघर
३. शिक्षण निरीक्षक, मुंबई दक्षिण/पश्चिम/उत्तर विभाग
४. शिक्षण उपसंचालक, मुंबई विभाग, मुंबई
५. सर्व भरारी पथक प्रमुख

**प्रत माहितीस्तव –** मा.सचिव, राज्यमंडळ, पुणे